# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८
## अ प्रभाग समिती
## सभावृत्तांत [कार्यपत्रिका क्रमांक 02]

दिनांक : 16/11/2021 वेळ : सकाळी 11.30 वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे नोव्हेंबर 2021 ची मासिक सभा मंगळवार दिनांक 16/11/2021 रोजी सकाळी 11.30 वा. अ क्षेत्रीय कार्यालयातील "राजमाता जिजाऊ सभागृह" येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे | सभापती |
| 2. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सदस्या |
| 3. | मा.राजू मिसाळ | सदस्य |
| 4. | मा.शैलजा अविनाश मोरे | सदस्या |
| 5. | मा.शर्मिला राजू बाबर | सदस्या |
| 6. | मा.कोमल दिपक मेवानी | सदस्या |
| 7. | मा. कदम सुनिल मानसिंग | स्वीकृत सदस्य |
| 8. | मा. कांबळे राजेंद्र नामदेव | स्वीकृत सदस्य |

याशिवाय मा.श्रीमती शितल वाकडे - प्र. क्षेत्रिय अधिकारी, मा.श्री. रविंद्र पवार-कार्यकारी अभियंता (स्थापत्य),मा.श्री प्रवीण घोडे- कार्यकारी अभियंता (विद्युत),मा.श्री अनिल शिंदे-कार्यकारी अभियंता(जलनि:स्सारण)मा.श्री शिवाजी लोखंडे-लेखधिकारी,मा.श्री के.डी.दरवडे-सहाय्यक आरोग्याधिकारी, मा. श्री संजय खरात-उपअभियंता(स्थापत्य) मा.श्री लांडे बी.पी.-उपअभियंता(विद्युत),मा.श्रीमती मोमीन झेड.आय. -उपअभियंता (झोनिपु - स्थापत्य), श्री पवार व्ही.एस.-कनिष्ठ अभियंता(विद्यतु) श्री ए.एम.झिटे-मुख्य् आरोग्य् निरिक्षक, श्री कोटीयाना डी.एम.-आरोग्य निरिक्षक (पशुवैद्यकिय विभाग), श्री सुनिल दत्तू नाळे-उद्यान अधिकारी, श्रीमती धनश्री गजानन भांबुरे-उद्यान /वृक्ष संवर्धन अधिकारी, श्री मरळीकर जे.अे.-मुख्य लिपिक, श्री डी.जी.कांबळे-उद्यान सहाय्यक, इ. अधिकारी/ कर्मचारी बैठकीस उपस्थित होते.

सर्वप्रथम मा. सभापती, शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे यांची अ प्रभाग समितीचे "सभापती" पदी निवड झाल्याने मा.अतिरिक्त् आयुक्त् यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करणेत आले.

मा.सभापती यांनी  यांनी सर्व उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, अधिकारी यांचे स्वागत करुन  सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

यानंतर बैठकीचे कामकाज सुरु करणेत आले.

कार्यपत्रिका क्रमांक ७ दिनांक १०/८/२०२१ रोजी झालेल्या अ प्रभाग समिती सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत असलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

कार्यपत्रिका क्रमांक १  दिनांक २९/१०/२०२१ रोजी झालेल्या अ प्रभाग समिती विशेष सभेचा(सभापती निवड) सभावृत्तांत कायम करणेत येत असलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

त्यानंतर प्रस्तुत सभेमध्ये खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून दाखल करुन घेण्यात आले.

विषय क्रमांक ४:- सन्मा.सदस्या शर्मिला बाबर   यांचा दिनांक १६/११/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

प्रभागातील सेक्टर २५, एल.आय.जी कॉलनी, मोन्जीनीस केक शॉप जवळील चौकास जेष्ठ समाजसेवक **"विष्णू मारुती सायकर"** असे नामकरण करणेबाबत सर्व नागरिकांची मागणी असलेने सदरचे प्रस्तावास मान्यता देणे.

सभेत खालीलप्रमाणे ठराव मंजूर करणेत आले.

विषय क्रमांक 1

ठराव क्रमांक 02

विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव

दिनांक 16/11/2021

अनुमोदक : कोमल मेवानी

सुचक: अनुराधा गोरखे

संदर्भ:- १) सन्मा.सदस्य तुषार रघुनाथ हिंगे  यांचा दिनांक २१/०९/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १० मधील मोरवाडी सेंट्रल मॉल मागे २ जुने वाचनालय आहेत व ते खूप दिवसांपासून बंद देखील आहेत. तेथे रात्रीच्या वेळी मुले मुली थांबलेली असतात व तेथे चुकीचा प्रकार घडत आहे. तेथील नागरिकांनी तक्रार केली आहे. त्या अनुषंगाने सदरची २ जुनी वाचनालये हटविण्याचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

-----------------------------

ठराव क्रमांक 03
विषय क्रमांक 2

दिनांक: 16/11/2021
विभाग: सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: मा.अनुराधा गणपत गोरखे
अनुमोदक मा. कोमल मेवानी

संदर्भ१) सन्मा.सदस्य तुषार रघुनाथ हिंगे यांचा दिनांक २९/०९/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १० मधील मोरवाडी गावठाण परिसरामध्ये अनेक वर्षापासून शौचालय पूर्णपणे खराब व दुर्बल अवस्थेत झाले आहेत. त्या ठिकाणी सध्या खूप दुर्गंधी होत असल्याने सदर ठिकाणातील नागरिकांना खूप त्रास होत आहे. तरी तेथील ते शौचालय पाडून त्या ठिकाणी नवीन शौचालय बांधले तर सर्व नागरिकांना उपयोगी ठरेल. तरी तेथील शौचालय पाडून नवीन शौचालय बांधणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------------------------------

ठराव क्रमांक 04
विषय क्रमांक 3

दिनांक 16/11/2021
विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: मा. शर्मिला बाबर
अनुमोदक:मा. अनुराधा गणपत गोरखे

संदर्भ:- सन्मा.सदस्या कोमल दिपक मेवानी यांचा दि.१/११/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १९ मध्ये पिंपरी मेन बाजार पेठ बी ब्लॉक ४ पासून ३१ पर्यंत महानगरपालिकेच्या काही जागा बंद अवस्थेत आहेत व महापालिकेचे सार्वजनिक संडास बाथरुम व मुतारी या देखील बंद आहेत त्या ठिकाणी काही स्थानिक नागरिक जागा बंद असल्या कारणाने व बंद असलेले संडास बाथरुम तोडून अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे स्थापत्य विभागांतर्गत त्या बंद जागा विकसित कराव्यात व बंद संडास बाथरुम तोडून त्या जागेवर महानगरपालिकेचे आरोग्य कार्यालय, जेष्ठ नागरिकांकरिता विरंगुळा केंद्र व नागरिकांसाठी धर्मशाळा बनविणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

--------------------------------

विषय क्रमांक 4

ठराव क्रमांक 5

विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव

दिनांक :16/11/2021

अनुमोदक :मा. अनुराधा गोरखे

सुचक: मा. शर्मिला बाबर

संदर्भ:- सन्मा.सदस्या शर्मिला बाबर यांचा दिनांक १६/११/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

प्रभागातील सेक्टर २५, एल.आय.जी कॉलनी, मोन्जीनीस केक शॉप जवळील चौकास जेष्ठ समाजसेवक **"विष्णू मारुती सायकर"** असे नामकरण करणेबाबत सर्व नागरिकांची मागणी असलेने सदरचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे- सभापती,अ प्रभाग समिती यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी/अधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

[शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्रमांक:-अक्षेका/9/कावि/55 /2021 दिनांक:-22/11/2021.

(शितल वाकडे)
प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती, निगडी-44

प्रति,

सर्व संबंधित ----------------------------